महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
ग्रामिण रुग्णालय कुडाळ, जिल्हा-सिंधुदुर्ग.

रुग्णालय दूरध्वनी क्र.: कार्यालय दूरध्वनी क्र.:	(02363)222483 (02363)221781	जिजामाता चौक, कुडाळ, जिल्हा-सिंधुदुर्ग. (४१६ ५२०) ई-मेल : ms_rhkudal@yahoo.co.in
आरोग्य सेवा	जा.क्र./ग्रारुकु/भाडार / इंटरनेट सर्व्हिस / दुसरी सुचना / 1177/२०२६ दिनांक :३०/०९/२०२६	

दरपत्रक दुसरी जाहिर सूचना

विषय :- **ग्रामिण रुग्णालय कुडाळ** या रुग्णालयातील कामकाज सुरळीत चालण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हातील इच्छुक इंटरनेट सुविधा पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून इंटरनेट सुविधा देण्याबाबत दरपत्रक सादर करण्याबाबत..

संदर्भ :- शासन निर्णय उदयोग उर्जा व कामगार विभाग क्रं. भा.ख.स. २०१४/प्र.क्रं.८२/भ/उदयोग ४ दिनांक ०१/१२/२०१६

आपण्यास कळविण्यात येते की उपरोक्त संदर्भ क्रं. १ शासन निर्णयातील ३.२.३ मधील तरतूदी प्रमाणे या **ग्रामिण रुग्णालय कुडाळ** येथे खालील नमूद केलेल्या बाबीचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता दरकरार करण्यासाठी सिलबंद लिफाफातून दरपत्रक मागवित आहेत.

अ. क्रं.	बाबींचे नाव	दरपत्रक कालावधी	दरपत्रक सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ
१	फायबर इंटरनेट (सविस्तर यादी सोबत जोडली आहे)	दिनांक ३० /०९/२०२६ ते ०६/१०/२०२६ (कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून)	दिनांक ०६ /१०/२०२६ सायंकाळी ४.३० वाजेपर्यत

Medical Superintendent Cl
Rural Hospital, Kudal

अटी व शर्ती

दरपत्रक सादर करताना त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करणे अनिवार्य आहे.

१. शासकीय सुट्टीचा दिवस वगळता दिनांक ०४/०९/२०२६ ते दिनांक १५/०९/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत आणी दिनांक दिनांक १५/०९/२०२६ रोजी सांयकाळी ४.३० वाजेपर्यंत लिफाफा बंद दरपत्रके स्विकारण्यात येतील. टपालाने अथवा कुरीयर सेवेमार्फत पाठवलेले दरपत्रक विलंबाने प्राप्त झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

२. दिनांक १५/०९/२०२६ रोजी सांयकाळी ५.३० वाजता वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय कुडाळ यांच्या दालनात खरेदी समितीच्या समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील. इच्छुक दरपत्रकधारक किंवा त्यांचा अधिकृत पत्र असलेला प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याची अनुमती आहे.

३. लिफाफ्यावर "Quotation require for Internet Service Provider at Rural Hospital Kudal" असा उल्लेख करावा.

४. दरपत्रक "**मा. वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, ग्रामीण रुग्णालय, कुडाळ**" या नावाने सादर करावे.

५. दर सुवाच्य अक्षरात व अंकात नमूद करावे, खाडाखोड असलेले दरपत्रकच विचारात घेतले जाणार नाही. सर्व दर करासहित सादर करावेत. दरपत्रक सादर करतेवेळी अनुज्ञेय असलेले सर्व शासकीय कर विचारात घेऊन दरपत्रक भरावे. तसेच करार वैध असेपर्यंत दरामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येणार नाही. दरपत्रकात नमूद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.

६. अटी व शर्तीसह असलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

७. नमूद दर हे सर्व प्रकारच्या करासहित तसेच या कार्यालयास पोच करावयाच्या वाहतूक खर्चासहित सादर करावेत. त्या व्यतिरीक्त अन्य कोणतेही दर अदा केले जाणार नाही.

८. दरपत्रके ही संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावीत. तसेच नमुना प्रपत्रामध्ये दर नमूद करुन सही व शिक्का सह सादर करावीत.

९. पुरवठादाराने दरपत्रकासोबत खालील कागदपत्राच्या स्वंसाक्षांकित प्रत जोडावे -
   १. संस्था नोंदणी प्रमाणपत्र अथवा शॉप ॲक्ट लायसन्स
   २. उद्यम नोंदणी प्रमाणपत्र
   ३. जी एस टी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरिक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.
   ४. पॅन कार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत
   ५. बॅंक पासबुक पहिल्या पानाची झेरॉक्स

१०. कराराच्या सर्व अटी व शर्तीनुसार वस्तूची खात्री झाल्यानंतरच व अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल. कोणत्याही स्वरुपात देयकाची आगाऊ रोख रक्कम मिळणार नाही. तसेच देयाकाची अदायगी RTGS/NEFT/PFMS पध्दतीनेच करण्यात येईल.

११. ज्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार पुरवठा दिलेल्या कालावधीत करणे बंधनकारक राहिल.

१२. दरपत्रक सादर करताना फक्त सिंधुदुर्ग जिल्हातील मान्यता प्राप्त इंटरनेट सुविधा पुरवण्याऱ्या संस्थेचा विचार करण्यात येईल.

१३. उपरोक्त नमूद इंटरनेट सेवेचा पुरवठा दररोज विनाखंड सुरु ठेवावी.

१४. दंड-उपरोक्त नमूद कालावधीत पुरवठा न केल्यास विलंबाच्या कालावधीसाठी ०.५% प्रतिसप्ताह या दराने दंड आकारण्यात येईल.

१५. प्रस्तुत दरपत्रकाचा कालावधी हा दरपत्रके स्विकारल्यापासुन एक वर्षाचा राहील.

१६. पुरवठातील अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१७. दरपत्रक मंजुर झाल्यानंतर पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच कोणतीही पूर्व सूचनेशिवाय दरकरार रद्द करण्यात येईल आणी मंजुर पुरवठादाराचे नाव काळ्या यादीत घालण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१८. कोणतेही संपूर्ण दरपत्रक किंवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कारण न दर्शवता स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच खरेदी करावयाच्या साहित्यात आवश्यकते प्रमाणे बदल करण्याचा अंतिम अधिकार वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णलय कुडाळ यांनी राखून ठेवलेला आहे.

वैद्यकीय अधिक्षक,

ग्रामीण रुग्णलय कुडाळ
जिल्हा - सिंधुदुर्ग

ग्रामिण रुग्णालय, कुडाळ जि. सिंधुदुर्ग.

Medical Superintendent Cl
Rural Hospital, Kudal

ग्रामीण रुग्णालय कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग

या रुग्णालयातील सर्व विभागातील कामकाज सुरळीत चालण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात फायबर इंटरनेट सुविधाचा पुरवठा करण्यासाठी दरपत्रक..

No	Internet Speed	१२ Month	Rate	GST%	With GST Rate
१	१०० mbps	Connection			
२	१५० mbps	Connection			
३	२०० mbps	Connection			
४	३०० mbps	Connection			

सदरचे दरपत्रक हे आपल्या संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे व त्यावर संस्थेचा जीएसटी नंबर नमूद करावा.

स्थळ: -

दिनांक: -

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नाव: -

पत्ता: -

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात तयार करावे

बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करतो की मी / आम्ही वर नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे / आहोत.

जर माझी / आमचे दरपत्रक स्वीकृत करण्यात आले तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी / आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी / आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीलनुसार अट १ ते १८ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ: -

दिनांक: -

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नाव: -

पत्ता: -

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात तयार करावें

स्वघोषणापत्र

(१) मी/आम्ही असे जाहिर करतो कि,या दरपत्रकामध्ये किमान मुल्यापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत.या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवयाय काळयायादीतील नाही. मी किंवा माझे व्यवसायातील नोकर वर्ग यांचा जिल्हा शल्य चिकित्सक,सिंधुदुर्ग किंवा त्यांचे अधिपत्याखालील संस्था या मध्ये कोणतेही नाते वा हितसंबध नाहीत.

(२) मी/आम्ही असे जाहिर करतो कि,माझे/आमचे व्यवसायाचे जीएसटी - वस्तु व सेवा कर याची नोंदणी झालेली असुन वार्षिक आर्थिक उलाढाल रु.२०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर परतावा नियमित भरणेत येतो.

(३) मी/आम्ही असे जाहिर करतो कि,माझे/आमचे व्यवसायाचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु.२०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर या बाबतची नोंदणी केलेली नाही.

(२) व (३) पैकी जे आवश्यक आहे हे ठेवुन इतर खोडावे.

स्थळ -

दिनांक -

नाव -

सही -

रबरी शिक्का